मोटार अपघात दावा क्र.८५/२०२०
हर्षदा वि. अरूण
नि.क्र.४२.

**अर्जदारातर्फे साक्षीदार क्र.२ ची जबानी**

**मी याद्वारे शपथेवर निवेदन करतो की,**

नाव– सुचेता नारायणराव काबदे,
वय– ६३ वर्षे,
व्यवसाय– वकिली,
राहणार– धाराशिव.

**<u>अर्जदारातर्फे सरतपासणी वकिल श्री.एस.एम. इंगळे यांच्या वतीने</u>**

१. मी १ ली ते बी.ए. पर्यंतचे शिक्षण तेलगू भाषेत केलेले आहे. मी बी.एड्.मराठी मध्ये केले असल्याने मला मराठी भाषा येते. मला तेलगू व मराठी दोन्ही भाषा लिहीता आणि वाचता येते. मला आता नि.क्र.३२ दाखविले. तो तेलगू भाषेत असून त्याचा नामउल्लेख शवविच्छेदन पंचनामा आहे. तो पंचनामा कुशल देशपांडे यांचा आहे. मी तेलगू भाषेतील शवविच्छेदन पंचनामा मराठीमध्ये भाषांतरीत केलेला आहे. आता मला दाखविलेला भाषांतरीत पंचनामा त्यावर माझी सही व शिक्का आहे. मी तेलगू पंचनामा पडताळून पाहिला असता त्याचे मी केलेले मराठी भाषांतर बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.४३</u>** देण्यात येते.

२. आता मला नि.क्र.३३ वरील तेलगू भाषेतील घटनास्थळ पंचनामा दाखविला. मी त्याचे मराठीमध्ये भाषांतर केलेले आहे. आता मला दाखविलेला भाषांतरीत घटनास्थळ पंचनामा मी केलेला आहे. त्यावर माझी सही व शिक्का आहे. मी तेलगू मधील घटनास्थळ पंचनामा पडताळून पाहिला. त्याचे मी केलेले मराठी भाषांतर बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.४४</u>** देण्यात येते.

**<u>उलट तपास गैरअर्जदार क्र.१ करिता विधीज्ञ श्री.ए.व्ही.वाडकर यांच्या वतीने</u>**

३. नाकारला.

मोटार अपघात दावा क्र.८५/२०२०

हर्षदा वि. अरूण

नि.क्र.४२.

**उलट तपास गैरअर्जदार क्र.२ करिता विधीज्ञ श्री.डोईजोडे यांच्या वतीने**

४. मी पदवीपर्यंत तेलगू भाषेत शिक्षण घेतले असल्याबाबत आजरोजी कागदोपत्री पुरावा आणलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याकडे तेलगू भाषेत शिक्षण घेतल्याचा पुरावा नसल्यामुळे मी तेलगू भाषेतील कागदपत्रांचे मराठीत भाषांतर केले हे मी चुकीचे सांगते. हे म्हणणे खरे नाही की, मला तेलगू भाषा कळत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी मराठी भाषांतरीत कागदपत्रांवर केवळ सही केलेली आहे. त्यातील मजकूराबाबत मला काहीही माहिती नाही. माझ्याकडे भाषांतर करण्यासाठीचा परवाना नाही. मी मराठी भाषेत बी.एड्‌ केल्याबाबतचा पुरावा माझ्याकडे आहे. मी भाषांतरीत कागदपत्राची स्थळप्रत माझ्याजवळ ठेवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, अपघातामध्ये जीप क्र.एपी–०४–६९८ या वाहनाचा देखील समावेश होता. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ पंचनाम्यामध्ये जीपने कारच्या डाव्या बाजूस मध्यभागी धडक दिलेली आहे असा मजकूर नमूद आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे ती कार झाडाला जावून धडकली व परत रस्त्याच्या मध्यभागी आली असा मजकूर पंचनाम्यात नमूद केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यामध्ये ती जीप धडक दिल्यानंतर शेतामध्ये जावून घुसली असा मजकूर नमूद आहे.

**उलट तपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत केले.

Digitally signed by PADMAKAR PRABHAKAR KESTIKAR
Date: 2025.12.18 12:34:47 +0530

(पी.पी.केस्तीकर)

दि.१७/१२/२०२५

पदसिध्द सदस्य,मो.अ.दा.प्रा.,

लातूर